

देगलूर : विभागीय टेबल टेनिस स्पर्धेत देगलूर महाविद्यालयाने प्रथम क्रमांक पटकावित यशाचा झेंडा रोवला.

# मुलींच्या संघाचे टेबल टेनिस स्पर्धेत यश

**देगलूर :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ व स्वामी विवेकानंद महाविद्यालय शिरूर ताजबंद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'ब' विभागीय टेबल टेनिस स्पर्धेत देगलूर महाविद्यालयाच्या मुलींचा संघाने अंतिम सामन्यात चुरशीचा खेळ दाखवित विजेतेपद प्रथम क्रमांक प्राप्त केला. संघाचे प्रशिक्षक म्हणून डॉ. निरजकुमार उपलंचवार, प्रा. दीपक वावधाने, प्रा. सीताराम हाके यांनी काम पाहिले होते. महाविद्यालयातील मुलींचे प्रतिनिधित्व करणाऱ्या खेळाडूंमध्ये ऋतुजा पेरके, सृष्टी इंगोले, वैष्णवी इंगोले, मयुरी गुजलवाड, पल्लवी सुर्यवंशी यांचा समावेश होता. यशस्वी विद्यार्थिनीचे अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेंबरेकर, सचिव शशीकांत चिद्रावार, उपाध्यक्ष नारायणराव मैलागीरे, सहसचिव सुर्यकांत नारलावार, कोषाध्यक्ष विलास तोटावार व कार्यकारिणी मंडळ सदस्य राजकुमार महाजन, डॉ. कर्मवीर उंग्रतवार, जनार्दन चिद्रावार, गंगाधर जोशी, रवींद्रअप्पा द्याडे, देवेंन्द्र मोतेवार, चंद्रकांत नारलावार, प्राचार्य डॉ. मोहन खताळ, उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, उपप्राचार्य प्रा. उत्तमकुमार कांबळे, पर्यवेक्षक प्रा. संग्राम पाटील, कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी आदींनी आभिनंदन केले आहे.

Scanned with OKEN Scanner